



म. ग्रं. सं. ठाणें
विषय
वा. क्र.
IRBK-0116635
IRBK-0116635

नवीन अभ्यासक्रमाप्रमाणें नागरिकशास्त्रावरील पुस्तक

# बाल-नागरिक

## पुस्तक दुसरें

[ मराठी दुसऱ्या इयत्तेसाठीं ]

लेखक

प्रा. केशव गोपाळ पंडित, एम्. ए.

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
आ. क्र. १६६३५ नों. दि. १०।८।५६
वि. ...

[ दहावी आवृत्ति ]

केशव भिकाजी ढवळे
श्रीसमर्थ-सदन
गिरगांव, मुंबई

मूल्य ५० पैसे

सर्वाधिकार सुरक्षित

पहिली आवृत्ति : १९४३
दुसरी आवृत्ति : १९४३
तिसरी आवृत्ति : १९४४
चौथी आवृत्ति : १९४५
पांचवी आवृत्ति : १९४७
सहावी आवृत्ति : १९४९
सातवी आवृत्ति : १९५२
आठवी आवृत्ति : १९६२
नववी आवृत्ति : १९६३
दहावी आवृत्ति : १९६५

मुद्रक : वि. पु. भागवत, मौज प्रिंटिंग ब्यूरो, खटाववाडी, मुंबई ४
प्रकाशक : धनंजय ढवळे, केशव भिकाजी ढवळे, गिरगांव, मुंबई ४

# दोन शब्द

प्राथमिक शाळांसाठीं शिक्षणखात्यानें सुधारून तयार केलेल्या नवीन अभ्यासक्रमांत 'नागरिक-शास्त्र' ह्या एका नवीन विषयाचा समावेश केला आहे. ह्या अभ्यासक्रमाला धरून 'बाल–नागरिक', पुस्तक पहिलें, दुसरें, तिसरें व चौथें हीं पुस्तकें लिहिलीं आहेत.

प्रत्येक पुस्तकांत त्या इयत्तेसाठीं नेमलेल्या भागांतील प्रत्येक पोटविषयावर एकेक धडा लिहिला आहे. विषयाची मांडणी, भाषा हीं त्या त्या इयत्तेतील मुलांना समजेल अशा तऱ्हेनें केली आहे. विशेष गोष्ट ही कीं सर्व विषयांचें विवेचन गोष्टीरूपानें अथवा प्रसंगपद्धतीनें केलेलें आहे. लहान मुलांच्या बाबतींत ही पद्धति किती यशस्वी ठरतें हें नव्यानें सांगण्याची जरूर नाहीं. प्रत्येक धड्याच्या शेवटीं उजळणीवजा प्रश्नही घातले आहेत. शिक्षकांना व मुलांना त्यांचा पुष्कळ उपयोग होईल. शास्त्रीय विषयाच्या अभ्यासांत माहितीपेक्षां [Theory] कृतीला [Experiment] अधिक महत्त्व आहे, हें ओळखून दिलेलें नागरिक शिक्षण मुलांच्या प्रत्यक्ष आचरणांत येत आहे, इकडे शिक्षक विशेष लक्ष देतील अशी आशा आहे.

'नागरिक शास्त्र' हा शब्द नवा असला, तरी विषय जुनाच आहे. समाजाची कल्पना अस्तित्वांत आली, त्याच वेळीं नागरिकशास्त्राचा जन्म झाला असें म्हटलें पाहिजे. सर्व शिक्षणाचें ध्येय आदर्श नागरिक तयार करणें हें होय, असें म्हटलें आहे व तें खरें आहे. नवीन अभ्यासक्रमांत नागरिकशास्त्राला स्थान मिळालें, हें योग्यच झालें. नागरिकत्वाला लागणाऱ्या सर्व गुणांची वाढ लहानपणापासून होत असते व म्हणूनच नागरिक शिक्षणाचा आरंभ लहान वयांत होणें हें इष्ट आहे. लहान मुलें हीं 'बाल-नागरिक' होत.

हीं पुस्तकें प्रसिद्ध करण्याच्या कामीं नवीन मराठी शाळेचे अनुभवी हेडमास्तर रा. शि. कृ. देशपांडे यांनीं केलेल्या साहाय्याबद्दल मी त्यांचा आभारी आहें.

**के. गो. पंडित**

फर्गसन कॉलेज, पुणें ४
वर्षप्रतिपदा, ता. ५।४।४३

# अनुक्रमणिका

## जबाबदाऱ्या पाळणें


| | | | |
|---|---|---|---|
| १. वर्गाची स्वच्छता | ... | ... | ५ |
| २. शाळेच्या आवाराची स्वच्छता | | ... | ८ |
| ३. शाळेचें वस्तुसंग्रहालय | ... | ... | १० |
| ४. पाणी पिण्याचा हौद | ... | ... | १४ |
| ५. शाळेचा बक्षिससमारंभ | ... | ... | १७ |
| ६. मनोरंजक कार्यक्रम | ... | ... | २० |
| ७. वर्गांत नवीं आलेलीं मुलें | ... | ... | २३ |


## मुलांचें गृहजीवन


| | | | |
|---|---|---|---|
| ८. आईबापांची जबाबदारी | ... | ... | २७ |
| ९. भाऊबहिणींची जबाबदारी | ... | ... | ३१ |
| १०. इतर वडील मंडळींची जबाबदारी | | ... | ३४ |
| ११. घरांतील नोकरचाकर | ... | ... | ३९ |
| १२. मुलें आणि घरांतील मंडळी | ... | ... | ४३ |
| १३. मुलांना करतां येण्यासारखीं कामें | | ... | ४९ |

# वर्गाची स्वच्छता



साडेअकरा वाजले. दुसरी घंटा झाली. सगळीं मुलें वर्गांत जाऊन बसलीं. मास्तर आले. रोजची चौकशी सुरू झाली. सेक्रेटरी उठला व सांगूं लागला—

'काळे व गोरे यांनीं बसायचीं बाकें खराब केलीं. त्यांवर माती टाकली व शाई सांडली.'

'गानू आणि भानू यांनीं कागद फाडून केरकचरा केला.'

'खरे व खोटे यांनीं फळ्यावर व भिंतीवर रेघोट्या ओढून ठेवल्या.'

'गुपचुपनें कपाटांतले नकाशे व चित्रें फाडलीं; आंतल्या वस्तु इकडे तिकडे उडविल्या.'

मास्तरांनीं या मुलांना जवळ बोलाविलें व विचारलें, 'या तक्रारी खऱ्या आहेत ना?'

सहांनीं अपराध कबूल केला. सातवा म्हणाला, 'मास्तर, सेक्रेटरी त्रास देतो, नुसती स्वतःची ऐट दाखवतो.'

'सेक्रेटरीची निवड तुम्हींच केलीत. मग आतां कां? त्याचा पहिला नंबर आहे. त्याचें तुमचें वाकडें थोडेंच आहे? स्वतः अपराध करायचा आणि सेक्रेटरीला दोष द्यायचा! खरें म्हटलें म्हणजे वर्गाची स्वच्छता ठेवणें हें तुम्हां सर्वांचेंच काम आहे. चांगल्या कपड्यांवर एक जरी डाग पडला, तरी त्यांची शोभा नाहींशी होते. वर्गांत एका मुलानें जरी घाण केली, तरी सर्व वर्गाची शोभा व शिस्त बिघडते. एक करतो, परंतु सर्वांना कमीपणा येतो. सर्वांवर दोष येतो. जा, एक वेळ मी तुम्हांला सोडून देतों.

तीं मुलें परत आपल्या जागेवर जाऊन बसलीं. नंतर मास्तर सगळ्या मुलांना उद्देशून म्हणाले—

'स्वच्छतेच्या बाबतींत सर्वांनीं सारखी काळजी घेतली पाहिजे. स्वतःसाठीं तशीच इतरांसाठीं. स्वच्छता नाहीं, तेथें मनाला आनंद वाटत नाहीं. काम करायला हुषारी वाटत नाहीं. स्वच्छता नाहीं, तेथें शुद्ध हवा खेळत नाहीं. अस्वच्छता हा आरोग्याचा मोठा शत्रु होय! स्वच्छता व टापटीप यांमुळें आपल्याला चांगलें वळण लागतें. आपला वर्ग शोभिवंत दिसतो. जाणाऱ्या येणाऱ्याला त्याकडे बघून समाधान वाटतें. मुलांनो, तुम्हांला व तुमच्या वर्गाला लोकांनीं चांगलें म्हटलें पाहिजे का वाईट?'


'चांगलें, चांगलें,' सगळीं मुलें ओरडलीं.

---

**अभ्यास :** (१) वर्गाची रोजची चौकशी कोणती? (२) मास्तरांनीं कोणत्या मुलांना जवळ बोलाविलें? कां बोलाविलें? (३) वर्गाची स्वच्छता कशानें विघडते? (४) 'एक करतो व सर्वांवर दोष येतो' म्हणजे काय? (५) वर्गांत स्वच्छता असल्यानें काय फायदा होतो? (६) 'अस्वच्छता हा आरोग्याचा मोठा शत्रु होय.' या वाक्याचा अर्थ सांगा.

धडा दुसरा

# शाळेच्या आवाराची स्वच्छता



शेवटचा तास खेळाचा होता. निरनिराळ्या वर्गांतलीं मुलें रांगेनें पटांगणावर येत होतीं. बरोबर वर्गाचे मास्तर होते. हेडमास्तर मधोमध उभे राहून सर्व वर्गांवर देखरेख करीत होते. ड्रिलसाठीं मुलें उभीं राहिलीं. ड्रिलमास्तरांनीं एकदा ‘आराम’, ‘हुश्शार’ केलें. इतक्यांत हेडमास्तर पुढें झाले व म्हणाले, ‘थांबा. मला अगोदर कांहीं सांगायचें आहे.’ सर्व मुलें त्यांच्याकडे बघत राहिलीं.

'आज चिवडा, शेव खाऊन घाणेरडे कागद सगळीकडे उडविणारीं पांच मुलें सांपडलीं.'

'कागदाचे कपटे व शेंगांचीं टरफलें फेंकतांना दहा आढळलीं.'

'भलत्या जागीं लघवी करून घाण करतांना चार पकडलीं.'

'संडास व मुतारींत नीट न बसलेलीं सहा मुलें धरलीं.'

वरील सर्व मुलांचीं नांवें हेडमास्तरांनीं वाचून दाखविलीं. वर्गशिक्षकांनीं त्या मुलांना त्यांच्यासमोर उभें केलें. त्या सर्व मुलांनीं अर्धा तास घरीं उशिरां जावें असें हेडमास्तरांनीं फर्माविलें.

नंतर सर्व मुलांकडे वळून हेडमास्तर म्हणाले, 'वाईट सवयी लागणें फार सोपें, चांगल्या सवयी लागणें कठीण ! म्हणून लहानपणींच काळजी घेतली पाहिजे. सवयींचाच पुढें स्वभाव बनतो. शाळेचें आवार नेहमीं स्वच्छ राहिलें पाहिजे. कोठेंही कसली घाण होतां कामा नये. नाहींतर सगळ्या जागेची स्वच्छता व शोभा नाहींशी होते. जिकडे तिकडे घाण सुटते व

हवा बिघडते. अशा जागीं तुमचें मन रमेल कां? म्हणून लक्षांत ठेवा, कीं स्वच्छतेच्या कामीं सर्वांनीं मदत केली पाहिजे. त्यांत सर्वांचें हित आहे. तुम्ही शाळेंत शिकायला यतां ना? मग शाळेंत नुसतीं पुस्तकें वाचायला नाहीं शिकायचें; त्याबरोबर याही गोष्टी शिकायला पाहिजेत! स्वच्छता हा आरोग्याचा पहिला धडा आहे.'

---

**अभ्यास :** (१) हेडमास्तर मध्येंच 'थांबा' कां म्हणाले? (२) मुलांनीं काय वाईट गोष्टी केल्या? (३) त्या मुलांना कोणतें शासन मिळालें? (४) 'सवयींचाच पुढें स्वभाव बनतो' याचा अर्थ काय? (५) आवाराची स्वच्छता ठेवण्यासाठीं कोणत्या गोष्टींत जपलें पाहिजे? (६) 'स्वच्छता हा आरोग्याचा पहिला धडा आहे' या वाक्याचा अर्थ काय?

---

धडा तिसरा

## शाळेचें वस्तुसंग्रहालय

आज शनिवार! अर्धा दिवस शाळा! आठवड्याच्या अभ्यासाची उजळणी. नंतर करमणुकीचा कार्यक्रम व खेळ! मुलें आज फार आनंदांत! आजचा घरचा अभ्याससुद्धा वेगळा! आज गणित नाहीं आणि

शुद्धलेखन नाहीं. आजचा घरचा अभ्यास फार गमतीचा! छान छान चित्रें काढायचीं, सुंदर सुंदर वस्तु



जमवायच्या, हा आजचा अभ्यास! मुलांत एकमेकांत मोठी चुरस! ज्याला जें वाटेल तें त्यानें आणावें.

आजही मुलें तशाच तयारीनें आलीं होतीं. रिकाम्या हातांनीं कोणीही आलें नव्हतें. मास्तर आल्याबरोबर सगळीं मुलें आणलेल्या वस्तु हातांत घेऊन उभीं. 'शाबास, आज सगळ्यांनीं कांहीं ना कांहीं तरी आणलें आहे. खालीं बसा. मी एकेकाला हाक मारतों.' मास्तर म्हणाले.

'चला, आणा एकेक.'

'मास्तर, मीं सूर्य उगवतो त्या वेळेचा देखावा काढला आहे.'

'मीं आगकाड्यांच्या पेट्यांची बैलगाडी बनवली आहे.'

'वा ! छान केलीं आहेत तुम्हीं कामं. ठेवा टेबलावर. बघूं द्या साऱ्या मुलांना. पुढें, तूं रे मुकुंद !'

'मास्तर, मला कांहीं जुन्या काळचीं नाणीं मिळालीं आहेत.'

'मीं सुंदर रंगांचे व पंखांचे पक्षी आणले आहेत.'

'मीं मजेदार फुलें व पानें आणलीं आहेत.'

'मीं पिसें जमवलीं आहेत.'

'मीं निरनिराळे शंख व शिंपा आणल्या आहेत.'

'शाबास मुलांनो,' मास्तर म्हणाले, 'तुम्हीं सर्वांनीं आज उत्तम कामगिरी केली आहे.'

सर्वांनीं आपल्या वस्तु टेबलावर मांडल्या. टेबलावर छोटेंसें 'प्रदर्शन' च दिसत होतें. सगळ्यांचें पाहून झाल्यावर मास्तर म्हणाले—

'चला, आतां यांतल्या निवडक वस्तु आपण शाळेच्या वस्तुसंग्रहालयांत मांडूं. बाकीच्या वर्गात ठेवूं.' वस्तूंची निवड करून मास्तर निघाले. मुलें

त्यांच्या मागोमाग चालली. वस्तुसंग्रहालयांत आल्यावर तेथील निरनिराळे भाग मास्तर मुलांना दाखवूं लागले.

'या निरनिराळ्या कपाटांत निरनिराळ्या वस्तु ठेविल्या आहेत. एकांत जुन्या व दुर्मिळ वस्तु, नाणीं, हत्यारें, कपडे, चित्रें वगैरे ! दुसऱ्यांत सुंदर चित्रें व वस्तु यांचा संग्रह आहे. तिसऱ्यांत निरनिराळ्या यंत्रांचे नमुने ठेविले आहेत.'


'मुलांनो, वस्तुसंग्रहालय हें शाळेचें मोठें भूषण आहे. यांतील सुंदर वस्तु पुन्हा पुन्हा येऊन पाहात जा व यांत नेहमीं नवीन नवीन वस्तूंची भर घालीत जा. असें करण्यांत तुम्हांला आनंद तर होईलच, परंतु तुम्हांला नवें ज्ञानही होईल. सुंदर वस्तूंचा संचय करा. सुंदर वस्तूंचा शोध करा. सुंदर वस्तु हा आनंदाचा अखंड झरा आहे.'

---

**अभ्यास :** (१) शनिवारचा घरचा अभ्यास कोणता? (२) मुलांना तो आणण्यांत विशेष आनंद कां वाटतो? (३) मुलांनीं काय काय वस्तु आणल्या? (४) वस्तुसंग्रहालय म्हणजे काय? त्यांत काय असतें? (५) तुमच्या शाळेंत वस्तुसंग्रहालय आहे काय? (६) तुम्हीं वस्तुसंग्रहालयांसाठीं कांहीं वस्तु दिल्या आहेत काय? (७) वस्तुसंग्रहालयाचे फायदे काय? (८) 'सुंदर वस्तु हा आनंदाचा अखंड झरा आहे' या वाक्याचा अर्थ सांगा.

धडा चौथा

# पाणी पिण्याचा हौद



शाळेची मधली सुट्टी झाली. मुलें भराभर आपापले डबे घेऊन वर्गाच्या बाहेर निघालीं. कोणी झाडाखालीं, कोणी हिरव्या गवतावर, कोणी हौदाजवळ, ज्याला जेथें जागा मिळाली तेथें तो डबा उघडून फराळ करूं लागला. मुलांची कोण घाई! खाणें संपवून एकदा खेळायला केव्हां जायला मिळतें आहे! पाण्याच्या हौदाकडे जाण्यासाठीं ही गर्दी! आरडाओरडा काय आणि धक्काबुक्की किती विचारूं नका! शेवटीं तर

मारामारी जुंपली. तेव्हां हेडमास्तर बाहेर आले व त्यांना मुलांना दूर करावें लागलें.

'अरे तुम्ही मुलं का मवाली? भांडतां आहांत काय आणि मारामारी काय करतां आहांत? एवढी कसली घाई? कुठें जायचं आहे? मूर्ख कुठलीं! चला व्हा दूर!'

हेडमास्तरांचा आवाज ऐकतांच मारामारी थांबली. आपल्याला आतां मार बसणार या भीतीनें मुलें गांगरून गेलीं. हेडमास्तरांनीं भोवतालीं नजर फिरविली व ते म्हणाले,

'आणि काय रे, ही काय पाणी पिण्याची पद्धत? तीं दोघं पाहा तोट्यांना तोंड लावून पाणी पीत आहेत! तीं तिघं पाहा हौदावरच खायाला बसून उरलेलं हौदांत टाकीत आहेत आणि तीं चौघं तर डबे घासून ते हौदांतच विसळीत आहेत. ए, चला या खालीं सगळीं. मूर्ख मुलं कुठलीं!'

हेडमास्तर ओरडतांच सगळीं मुलें खालीं उतरलीं व कावरींबावरीं बघूं लागलीं. हेडमास्तर सर्वांना अगोदर रागें भरले व त्यांनीं सर्वांना समोर रांगेंत उभें राहाण्यास सांगितलें. सगळीं मुलें नीट उभीं राहिल्यावर ते म्हणाले,

'हें पाहा, सगळ्यांनीं मी काय सांगतों इकडे लक्ष द्या. हा पाणी पिण्याचा हौद आहे, खरं ना? मग हौदावर घाण केली तर ती पाण्यांत जाऊन पाणी नाहीं का घाणेरडं होणार? तेंच पाणी पितांना त्यांतली घाण तुमच्या पोटांत नाहीं का जाणार? घाण पोटांत गेल्यावर तुम्ही आजारी नाहीं का पडणार?'

हेडमास्तरांच्या प्रत्येक प्रश्नाला मुलें 'हो हो' करून माना डोलावीत होतीं.

'नंदीबैलासारखी नुसती मान डोलावून नाहीं चालायचं. पाण्याचा हौद नेहमीं स्वच्छ ठेवला पाहिजे. त्यावर कोणींही, कुठेंही, कसलीही घाण करतां कामा नये. काय समजलांत? आतां कुणी चुकूं नका. वेड्यांनो, शुद्ध हवेची जितकी जरुरी, तितकीच स्वच्छ पाण्याची जरुरी! अशुद्ध हवा व अस्वच्छ पाणी हे आरोग्याचे दोन मोठे शत्रु होत.'


---

**अभ्यास** : (१) मुलांना कसली घाई झाली होती? (२) 'तुम्ही मुलं का मवाली' असें हेडमास्तर कां म्हणाले? (३) हौदावर मुलांनीं काय घाण केली होती? (४) हौदाचें पाणी घाण करण्यानें काय काय परिणाम होतात? (५) 'आरोग्याचे शत्रु' म्हणजे काय? कोणते ते शत्रु?

धडा पांचवा

# शाळेचा बक्षीससमारंभ

शाळेचा वार्षिक बक्षीससमारंभ जवळ आला होता. यंदाचा समारंभ मोठ्या थाटानें व्हायचा होता. प्रांताचे शिक्षणमंत्री अध्यक्ष ठरले होते. मोठमोठी मंडळी यायची, मोठमोठ्या देणग्या मिळायच्या! शाळेंतील शिक्षकांची आठ-पंधरा दिवस कोण धांदल ?



बोलायला वेळ नाहीं त्यांना. आमंत्रणें पाठवायचीं, बक्षिसें निवडायचीं, कार्यक्रम बसवायचा, जागा शृंगारायची, एक ना दोन, हजार कामें ! सगळ्यांची अगदीं गडबड उडून गेली.

समारंभाविषयीं मुलांचा किती दांडगा उत्साह! जो तो, 'मास्तर, मला काम द्या,' असा हट्ट धरूं लागला. मास्तर सगळ्यांना 'हो, हो' करून समजावीत होते, परंतु मुलें ऐकेनात. 'सांगा आम्हांला काय काय कामें दिलीं आहेत तीं,' मुलें मोठ्यानें म्हणालीं. शेवटीं मास्तरांचा नाइलाज झाला व ते म्हणाले,

'सांगतों, तुम्ही सर्व खालीं बसा. हें बघा, आपला समारंभ चांगला झाला पाहिजे, खरं ना? तेव्हां ज्याला जें काम चांगलं येतं, तेंच त्याला दिलं पाहिजे, होय ना? तेव्हां आतां तुम्हीच सांगा पाहूं, गाण्यासाठीं कुणाला घ्यायचं?'

'सरला भाटे, उषा गुप्ते, मधुकर साने, वसंत पाध्ये.' मुलांनीं सांगितलें.

'शाबास! बरोबर निवड केलीत. भाषणांत कोण?'

'जठार, होनप, पिंगळे, दळवी.'

'छान, शहाणीं आहांत तुम्ही सगळीं. बरं, आतां ड्रिलसाठीं?'

'यंदे, पारखी, गोखले, खरे, जोशी.'

'पुरे, सगळ्या वर्गांतलीं थोडीं थोडीं घ्यायचीं ना मुलं? बरं, आतां तुम्ही बाकीचीं मुलं काय कराल?'

'आम्ही रंगीत पताका करूं.'

'आम्ही निशाणं लावूं.'

'आम्ही खुर्च्या, बाकं मांडूं.'

'आम्ही तोरणं व फुलांच्या माळा बांधूं.'

'आम्ही फुलांचे गोटे देऊं.'

'आम्ही खाऊचे पुडे वांटूं.'

'सुंदर! हीं कामं तुम्ही जरूर करा. तुमचा आनंद व उत्साह पाहून मला फार समाधान वाटलं. काम करायला नेहमीं असंच पुढें यावं. मागें मागें राहूं नये. येईल तें काम करावं. नवीन शिकावं. काम करण्याची सवय केली म्हणजे अंगीं धीटपणा येतो. धमक येते व एकापेक्षां एक मोठीं कामं करण्याची इच्छा होते. उद्योग हा मुलांचा मित्र. आळस हा शत्रु. सगळ्यांनीं उत्साहानें कामं करा, म्हणजे आपला समारंभ पाहून लोक खूष होतील.'

---

**अभ्यास :** (१) मास्तरांची धांदल कां उडाली? (२) मुलें कसला हट्ट धरून बसलीं? (३) मास्तरांनीं त्यांची कशी समजूत केली? (४) समारंभासाठीं कोणाची निवड केली? ती निवड कोणीं केली? (५) इतरांना काय काम मिळालें? (६) 'उद्योग हा मित्र व आळस हा शत्रु' म्हणजे काय? (७) तुम्हांला काम करायला आवडतें का?

धडा सहावा

# मनोरंजक कार्यक्रम









दर शनिवारीं शाळेंत एक तास मनोरंजक कार्यक्रम असे. आठवडाभर अभ्यास केल्यावर हा शनिवारचा कार्यक्रम मुलांना फार आनंदाचा वाटे. एकेका शनिवारीं एकेका वर्गाचा कार्यक्रम असे. आज प्रभुणे मास्तरांच्या वर्गाचा कार्यक्रम ठरला होता. वर्ग भरल्याबरोबर मास्तरांनीं सेक्रेटरीला विचारलें,

'कार्यक्रमाची सगळी तयारी आहे ना? सर्व वर्गांत आपल्या वर्गाचा नंबर पहिला लागला पाहिजे.'

'मास्तर, आमचा कार्यक्रम फारच छान बसला आहे. सगळीं मुलं आपापलीं कामं मन लावून करतात.' सेक्रेटरीनें उत्तर दिलें.

'असं? मग पाहूंच आतां कसा काय होतो कार्यक्रम तें! कोण कोण, काय काय, करणार आहे? सांगा पाहूं.'

'मास्तर, आम्ही चौघे 'घरचा अभ्यास' हा संवाद करून दाखविणार आहोंत.'

'मी गबाळ्या गणूची गमतीदार गोष्ट सांगणार आहें.'

'आम्ही दोघी भिल्लिणींचा नाच करून दाखविणार आहोंत.'

'मी 'म्हणे नापास' ही नाट्यछटा करून दाखविणार आहें.'

'आम्ही खलाश्यांचं गाणं म्हणणार आहोंत.'

'आम्ही भाला व लेजीम ह्यांची कवाईत करणार आहोंत.'

'वा! खूपच कार्यक्रम बसवले आहेत तुम्हीं.

निरनिराळ्या गोष्टी आहेत त्यांत. गंमत होईल मोठी.' मास्तर म्हणाले.

'चला तर हॉलमध्यें! सगळीं मुलं तुमची वाट पाहात असतील.'

मुलांना घेऊन प्रभुणे मास्तर हॉलमध्यें गेले. मुलांनीं खरोखरच फार उत्तम कार्यक्रम करून दाखविला. जमलेल्या सर्व मुलांना, मास्तरांना तो फारच आवडला. प्रत्येक वेळेस टाळ्या वाजवून सर्वांनीं आपला आनंद व्यक्त केला. प्रभुणे मास्तरांचें व त्यांच्या मुलांचें सगळ्यांनीं कौतुक केलें.

कार्यक्रम संपल्यावर मुलें परत वर्गांत आलीं. प्रभुणे मास्तरांनीं सर्वांना शाबासकी दिली. मुलें खूष झालीं. मास्तर म्हणाले,

'असाच नेहमीं कार्यक्रमांत भाग घेत जा. शाळेंतच नव्हे तर घरींसुद्धा. गणपति जवळ आले आहेत. मुलांनीं मेळे काढावेत, आरत्या म्हणाव्यात; मुलींनीं माळा कराव्यात, रांगोळ्या काढाव्यात; गाण्याभाषणाच्या चढाओढी कराव्यात, खेळांचे कार्यक्रम

करावेत. उत्सवांत प्रत्येकानें कांहीं ना कांहीं तरी भाग घ्यावा. त्यांत आपल्याला आनंद होतो. इतरांची करमणूक होते. नवीन ओळखी होतात. नवीन गोष्टी दिसतात. एकलकोंडेपणा नाहींसा होतो. सगळ्यांशीं मिळूनमिसळून वागण्याची सवय होते. भित्रेपणा जातो. अंगांत हुषारी येते. कामाची आवड उत्पन्न होते. आळशी, अजागळ मुलं कोणालाही आवडत नाहींत. उद्योगी व हुषार मुलं सर्वांना प्रिय असतात.'

---

**अभ्यास :** (१) शनिवारीं शाळेंत कसला कार्यक्रम असे? (२) तो कार्यक्रम कशासाठीं असे? (३) प्रभुणे मास्तरांच्या मुलांनीं काय कार्यक्रम तयार केला होता? (४) तो कार्यक्रम इतरांना कसा काय आवडला? (५) गणपति-उत्सवांत तुम्ही भाग घेतां काय? (६) उत्सवांत भाग घेण्यापासून काय फायदे होतात?

---

धडा सातवा

## वर्गांत नवीं आलेलीं मुलें

शाळा नुकतीच भरली होती. पुराणिक मास्तर खुर्चीवर बसून मुलांना आपलीं पुस्तकें उघडण्यास सांगत होते. ते एकेकाला वाचायला सांगणार, इतक्यांत त्यांचें लक्ष कोपऱ्यांत बसलेल्या दोन मुलांकडे गेलें.

'काय रे, तुम्ही दोघे असे एकीकडे कां बसलांत? मुलांनो, हीं काल नवीं आलेलीं मुलं! त्यांच्या वडिलांची बदली झाल्यामुळें तीं येथें आलीं. त्यांची कोणाची ओळख नाहीं. त्यांना आपल्याजवळ बसवायचं तें असं दूर काय टाकलंत?'



सगळीं मुलें त्या नवीन मुलांकडे बघत राहिलीं. कोणी हूं कीं चूं करीना! पुन्हा मास्तर म्हणाले,

'अरे वेड्यांनो, नुसतीं बघत काय राहिलांत? त्यांना जवळ बोलवा. आपल्या शेजारीं बसवा. त्यांना येत नसेल तें सांगा. समजत नसेल तें शिकवा. त्यांना लागेल ती मदत करा.'

'तुमच्या घरीं पाहुणे आले म्हणजे तुमचे आईबाप त्यांची कशी व्यवस्था ठेवतात सांगा पाहूं? त्यांना काय हवं, काय नको हें पाहातात, खरं ना? मग वर्गांत नवीन आलेल्या मुलांशीं तुम्हीं अशाच रीतीनें वागलं पाहिजे. वर्गांत त्यांना परक्यासारखं वाटतां कामा नये. अगदीं घरच्यासारखं वाटलं पाहिजे.'

मास्तरांचें हें बोलणें ऐकून मुलांनीं आपली चूक सुधारण्याचा प्रयत्न केला. त्यांनीं त्या दोघांही नवीन मुलांना आपल्याजवळ बसविलें. मास्तरांना बरें वाटलें. दोघांपैकीं एकाकडे बोट करून मास्तर म्हणाले,

'नंदू, तूं वाच पाहूं.'

नंदूला तें पुस्तक नवीन असल्यामुळें तो अडखळत वाचूं लागला. कांहीं मुलें त्याला हसलीं. तें पाहातांच मास्तर त्यांना रागावले व म्हणाले,

'काल आलेला तो मुलगा. त्याला वाचतां येत नाहीं म्हणून हसतां? कांहीं वाटतं का तुम्हांला? वर्गांत नवीन येणाऱ्या मुलांबद्दल हेंच का तुम्हांला प्रेम? वर्गांतल्या मुलांबद्दल हीच का तुम्हांला आस्था?

असें असेल तर तुम्ही शाळेंत शिकायला व वर्गांत बसायला नालायक आहांत.'

मास्तर संतापलेले बघतांच हसणारीं मुलें खजील झालीं व खालीं पाहूं लागलीं. मास्तरांच्या तें ध्यानांत आलें; तेव्हां त्यांना उपदेश करण्याच्या हेतूनें ते म्हणाले,


'वर बघा. पुन्हा अशा तऱ्हेनें वागूं नका. झालं तें झालं. तुम्हांला अजून नीट कळत नाहीं. पण ध्यानांत ठेवा, कीं वर्गांतलीं सर्व मुलं म्हणजे एकमेकांचीं भावंडं. सगळ्यांनीं प्रेमानें वागलं पाहिजे. मिळून मिसळून राहिलं पाहिजे. एकमेकांना लागेल ती मदत केली पाहिजे. नव्या मुलांच्या बाबतींत त्यांनीं अधिकच काळजी घेतली पाहिजे. त्यांना लागेल ती मदत करणं व त्यांना संभाळून घेणं तुमचं कर्तव्य आहे.'

---

**अभ्यास :** (१) कोपऱ्यांत बसलेलीं दोन मुलें कोण होतीं? (२) मास्तरांनीं वर्गांतील इतर मुलांना काय विचारलें? (३) वर्गांतल्या मुलांनीं चूक कशी दुरुस्त केली? (४) नंदू वाचीत असतां मुलें कां हसलीं? (५) नवीन येणाऱ्या मुलांशीं तुम्हीं कसें वागलें पाहिजे?

धडा आठवा

# आईबापांची जबाबदारी



सकाळचे आठ वाजले. मुलांची आई आणि वडील नुकतींच उठून खालीं आलीं होतीं. मालकीण उशिरां उठते म्हणून स्वयंपाकीण व मोलकरीण ह्याही उशिरां आल्या. कामाचा गडी नऊ वाजतां आला. त्यानंतर त्याचें केर काढणें, मुलांना उठविणें, आंघोळी घालणें सुरू झालें.

साडेनवाला घरचे मास्तर शिकवायला आले. सगळ्या मुलांचें कुठें आवरलें होतें! एक मुलगा

आंघोळ केल्याशिवाय, तर दुसरी मुलगी तोंड धुतल्या शिवाय तशीच येऊन बसली. मास्तरांनीं त्यांना चांगली समज दिली. 'लवकर निजे, लवकर उठे, तया ज्ञान, आरोग्य, संपत्ति भेटे' हा उपदेश केला.

मुलांच्या आईबापांनीं तें सर्व ऐकलें. परंतु बोलतात काय? आईबाप स्वतः लवकर उठतील तेव्हां तीं मुलांना लवकर उठवतील, अगर त्यांचें बघून मुलें लवकर उठतील!

अभ्यास चालू असतां वडील सहज तेथें गेले. मास्तरांनीं त्यांना मुलांचीं प्रगतिपुस्तकें दाखविलीं. तिमाहींत मुलांना मार्क साधारण होते. उत्तम नव्हते. 'मास्तर, तुम्ही रोज शिकवितां परंतु मार्क मनासारखे नाहींत.' वडील म्हणाले.

'साहेब, मी माझ्याकडून होईल तें करतों आहें. मुलें हुशार आहेत, परंतु तीं घरीं मुळींच वाचीत नाहींत. त्यांच्याकडे आपण अथवा आईसाहेबांनीं थोडं लक्ष दिलं तर सुधारणा झपाट्यानें होईल.' मास्तर म्हणाले.

हें बोलणें आंत मुलांच्या आईनेंही ऐकलें. मास्तरांचें म्हणणें खरें होतें. तेव्हां तीं दोघें काय बोलतात?

साडेदहा वाजले. जेवण कुठें तयार होतें? सगळ्यांच्या आंघोळी कुठें उरकल्या होत्या? स्वयंपाकिणीवर आई रागावली. 'भांडीं उशिरां घांसून मिळतात म्हणून मी उशिरां येतें.' स्वयंपाकीण म्हणाली. मोलकरीण म्हणते, 'बाईसाहेब उशिरां उठतात. मग मी काय करूं लवकर येऊन?' घरकामाच्या गड्याला 'तूं उशिरां कां येतोस?' असें विचारण्याची आतां जरूरच राहिली नाहीं. जसे धनी तसे नोकर! आई व वडील एकमेकांकडे बघूं लागलीं व स्वस्थ राहिलीं.

मुलांनीं कसे तरी चार घास तोंडांत कोंबले व उशीर झाला म्हणून तीं धावत शाळेंत जाऊं लागलीं. त्यांचे कपडे स्वच्छ नव्हते. मधल्या वेळचें खाणें तयार नव्हतें. तशींच सारीं निघालीं. त्यांच्या पायांतसुद्धा नव्हतें.

तें सर्व पाहून आई व वडिल यांना दोघांनाही फार वाईट वाटलें. हा सर्व आपल्याच अव्यवस्थित वागण्याचा परिणाम हेंही त्यांच्या लक्षांत आलें. 'ह्या सर्व गोष्टींना शेवटीं आपणच जबाबदार.' आई म्हणाली. 'हो तर काय,' वडील बोलूं लागले, 'लहान मुलांची सर्व


जबाबदारी आईबापांवर आहे. त्यांचं निजणं, उठणं, खाणंपिणं, बसणं, कपडेलत्ते, लिहिणंवाचणं, सगळ्या गोष्टींकडे आईबापांचं लक्ष पाहिजे. वरील सर्व गोष्टींत नियमितपणा व नेमस्तपणा पाळला गेला पाहिजे. लहान मुलं आळशी झालीं, उनाड झालीं, आजारी पडलीं, तर तो दोष आईबापांचा ! त्यांचं मुलांकडे लक्ष नाहीं. मुलांना तीं नीट वळण लावीत नाहींत. वेल जसा वळवावा तसा वळतो, तसंच, मुलांचं आहे. त्यांना जसं वळण लावावं तसं लागतं. तसंच जें मोठीं माणसं करतात, त्याचं अनुकरण मुलं करतात. म्हणून आईबापांनीं स्वतः नीट वागलें पाहिजे. जो कित्ता आईबाप पुढें ठेवतील तोच मुलं गिरवतील !'

---

**अभ्यास :** (१) मास्तर आले तेव्हां मुलांचें कां आवरलें नव्हतें ? (२) मास्तरांनीं काय उपदेश केला ? (३) परीक्षेंत मुलांना मार्क कमी कां मिळाले ? (४) नोकरचाकर उशिरां कां येत होते ? (५) आईबापांनीं कोणत्या बाबतींत मुलांची विशेष काळजी घेतली पाहिजे ? (६) 'वेल वळवावा तसा वळतो, तशींच मुलें !' ह्या वाक्याचा अर्थ सांगा.

घडा नववा

# भाऊबहिणींची जबाबदारी



संध्याकाळ झाली. काळोख पडूं लागला. तरी खेळायला गेलेलीं मुलें घरीं आलीं नाहींत. ऑफिसांतून घरीं आलेले वडील चौकशी करूं लागले. मुलांची आई दारांत मुलांची वाट बघत उभी राहिली. तितक्यांत मुलें दुरून येतांना दिसलीं. लहान मुलें पुढें धावत होतीं, मोठीं मागें सावकाश चालत होतीं. घरांत येतांच आईनें मोठ्या मुलांना विचारलें.

'त्यांना पुढें धावत रे काय सोडतां? तिकडून

गाडीबिडी आली म्हणजे एकदम ? त्यांना आपल्या-बरोबर चालवावं, म्हणजे कसली भीति नाहीं.'

'तीं ऐकतच नाहींत,' मोठ्या मुलानें उत्तर दिलें. 'सारखीं पळत सुटतात! कांहीं विचारलें, कीं आम्हांलाच उलट वेडावतात.'

'नाहीं, ग आई,' लहान मुलें म्हणालीं, 'आम्हांलाच हे आपल्यांत घेत नाहींत. जेव्हां तेव्हां आम्हांला दबकावतात.'

'होय का रे ?' आईनें मोठ्यांना विचारलें, 'लहान भावंडांना असं दूर लोटायचं ? त्यांना हिडिसफिडिस करायचं ? ह्यांतच तुमचा मोठेपणा, खरं ना ?'

मोठीं मुलें गप्प बसलीं. आई पुढें म्हणाली,

'आणि घरीं यायला तरी किती उशीर केलात ? तुमच्याबरोबर त्यांना उशीर ! वेळेवर घरीं यायला काय झालं ? आज तुम्हीं असं केलंत कीं उद्यां तींही तसंच करायला शिकतील !'

'आम्ही केव्हांच निघालों होतों, पण ह्या ताईनें उशीर केला.' लहान मुलें सांगूं लागलीं.

'त्या लहान मुलांना शहाणपण आहे, तें तुम्हां मोठ्यांना नाहीं, होय ना ग? कशाला झालीस मोठी ?'

'आई, सकाळीं मी पाटीवर धडा लिहून ताईला दाखविला तर म्हणाली, काय कोंबडीचे पाय, मी नाहीं बघत जा.' असें बोलून धाकटी रडूं लागली.

'ती एकदम शहाणी झाली कीं नाहीं. दीडशहाणी! लहान भावंडांचं कौतुक करायचं, त्यांना उत्तेजन द्यायचं तें राहिलं बाजूला. उलट असं बोलून त्यांचं कोवळं मन दुखवायचं होय? शाळेंत जाऊन हेंच शिकायचं वाटतं?'

'आई,' मोठा भाऊ म्हणाला, 'तूं आम्हांला बोलतेस, पण त्यांना मात्र कांहीं सांगत नाहींस. तीं आमचं ऐकत नाहींत त्याचं काय? सकाळीं मीं छोटूला वाचायला हाक मारली. आला का विचार?'

'होय छोटू? दादाचं ऐकलं नाहींस तूं? जोड हात आणि सांग आतां नाहीं चुकायचा! लहानांनीं मोठ्यांचं नेहमीं ऐकावं! उलट उत्तरं देऊं नयेत. समजलं?'

लहान मुलांनीं माना डोलावल्या. मग आई मोठ्या मुलांमुलींकडे बघून म्हणाली,

'बघा ! किती लवकर त्यांनीं माझं ऐकलं तें ?' लहान आहेत तीं. थोडं त्यांच्या कलानं घ्यावं लागतं. गोड शब्दांनीं त्यांना सांगावं लागतं; म्हणजे तीं ऐकतात. तुम्ही जातां आपला अधिकार दाखवायला ! त्यानं सारं बिघडतं ! तीं बिथरतात. त्यांच्याशीं प्रेमानं वागा. तीं तुमचं सारं ऐकतील. तुम्ही सांगाल तसं वागतील. तुम्हांला किती मान देतील. जशीं फुलं, तशीं मुलं. हलक्या हातांनीं फुलं धरायचीं आणि गोड शब्दांनींच मुलें वळायचीं !'

---

**अभ्यास :** (१) आई दारांत कां वाट पाहात राहिली ? (२) लहान मुलांनीं आईजवळ काय तक्रारी केल्या ? (३) आई मोठ्या मुलांना काय म्हणाली ? (४) लहान मुलांनीं आपल्या मोठ्या भाऊबहिणींशीं कसें वागावें ? (५) मोठ्या मुलांनीं लहान भावंडांशीं कसें वागावें ? (६) तुम्ही लहान भावंडांशीं कसे वागतां ? (७) 'जशीं फुलं, तशीं मुलं', म्हणजे काय ?


---

धडा दहावा

# इतर वडील मंडळींची जबाबदारी

आज रविवार ! मुलांच्या शाळेला तशीच वडील माणसांच्या ऑफिसला सुट्टी ! काका, मामा सगळे

आज घरीं! सकाळीं उठल्याबरोबर मुलें गेलीं मामांच्याबरोबर फिरायला आणि येतांना खूपसा खाऊ



व पुष्कळसा खेळ घेऊन आलीं. घरीं आल्याबरोबर मुलांनीं गोंधळ सुरु केला. आईनें तो पाहिला तेव्हां ती बाहेर आली व ओरडली,

'आणा पाहूं तो खाऊ आणि खेळ इकडे. भांडल्याशिवाय कधीं कांहीं व्हायचंच नाहीं. लहान, मोठीं सगळीं सारखीं. आणि मामा, इतका का खाऊ आणि खेळ आणायचा? मुलं सांगणार आणि तूं ऐकणार! ही सवय बरी नाहीं! असले लाड पुढं

नडायचे. सगळ्यांना बजावतें. पुन्हा नाहीं बरं का भलतासलता हट्ट करायचा.'

दुपारीं जेवण झाल्यावर माजघरांत आई, मामी व काकी शिळोप्याच्या गोष्टी सांगत बसल्या होत्या. तेवढ्यांत शशी तेथें आली. काकी व मामी तिची चेष्टा करूं लागल्या.

'शशीनं आज काय थाट केला आहे. तिचा नवरा येणार आहे. तिला आज पाहायला!'

'खरंच, शशीचं लग्न लवकर करून टाकायचं, कसा हवा तुला नवरा शशी? काळा का गोरा?'

'बघा हं, तुम्ही मला चिडवाल तर!' शशी म्हणाली व ओरडूं लागली. 'शशी मोठ्या माणसासमोर असं ओरडूं नये. तूं जा पाहूं बाहेर खेळायला.' आईनें सांगितलें. आईची आज्ञा होतांच शशी बाहेर गेली. ती गेल्यावर काकी व मामीकडे बघून आई म्हणाली,

'लहान मुलांसमोर कसल्या लग्नाच्या गोष्टी? तुम्ही थट्टेंत बोलतां परंतु त्यांच्या मनावर त्याचा

अनिष्ट परिणाम होतो; तुमचं ऐकून तींही नवरानवरीच्या गोष्टी करूं लागतात. मुलांसमोर काय गोष्टी बोलायच्या आणि काय नाहीं ह्याचा विचार वडील मंडळींनीं अवश्य करायला हवा.'

संध्याकाळीं काका मुलांना घेऊन सिनेमाला गेले. आई व वडील कोणाला भेटायला गेलीं होतीं. घरीं आल्यावर मुलें सिनेमाला जाऊन आल्याचें त्यांना कळलें. मुलें घरांत जेवायला बसलीं असल्याचें बघून वडील मुलांच्या काकांना म्हणाले,

'सदूकाका, आज कोणत्या सिनेमाला गेलां होतां?'

'प्रेमी जोडपें, मदन टॉकीज' सदूकाकांनीं उत्तर दिलें.

'वा, छान! लहान मुलांना दाखवायला दुसरा चित्रपट नव्हता वाटतं? ह्या वयांत मुलांनीं प्रेमाचे धडे शिकायचे कीं पराक्रमाचे? त्यापेक्षां 'वीर अभिमन्यू'ला नेलं असतंस तर?'

'नाहीं, मला तो चित्रपट बघायचा होता, तेव्हां माझ्याबरोबर मुलांनाही मीं तोच दाखविला.'

'तूं तुझ्या दृष्टीनें पाहिलंस. पण मुलांच्या दृष्टीनं त्याचा विचार नको का करायला? आपलं मोठ्या

मंडळींचं चुकतं तें इथंच ! मोठ्या माणसांना जें योग्य तें मुलांनाही योग्य अशा समजुतीनें आपण वागतों. त्याचे परिणाम मात्र फार वाईट होतात. ज्या गोष्टी लहानपणीं मुलांना कळायला नकोत त्या कळतात. मुलांसाठीं निराळेच चित्रपट हवेत. भलते चित्रपट दाखवून आपण त्यांचं अहित करतों आहोंत. वडील माणसांनीं आपली जबाबदारी ओळखली पाहिजे.'

'भाऊ, तुमचं म्हणणं मला पूर्णपणें पटलं. माझी खरोखरच चूक झाली मुलांना नेण्यांत. मीं इतका दूरवर विचार केला नाहीं.'

'तूंच काय, बहुतेक सारेच जण दूरवर विचार करीत नाहींत. आपण सहज गोष्टी करतों, परंतु त्याचे परिणाम मुलांना पुढें भोगावे लागतात. आपण अशा चुका करतों आणि पुन्हा 'मुलं फाजील झालीं' अशी आपणच तक्रार करतों. मुलांना चांगलं किंवा वाईट वळण लावण्याची सर्व जबाबदारी आईबाप व घरांतील इतर वडील मंडळीवर आहे. मुलांचं मन म्हणजे कोरी पाटी ! तीवर चांगलंही लिहितां येईल अथवा वाईटही लिहितां येईल !'

**अभ्यास :** (१) मुलांनीं गोंधळ कां सुरू केला? (२) खाऊ व खेळ आणल्याबद्दल आई मामांना काय बोलली? (३) काकी व मामी ह्यांनीं शशीची काय चेष्टा केली? (४) आई, काकी व मामीला काय म्हणाली? (५) काकांवर मुलांचे वडील कां रागावले? (६) मुलांनीं कोणते चित्रपट पाहावेत? तुम्ही कोणते पाहातां? (७) 'मुलांचें मन म्हणजे कोरी पाटी' ह्या शब्दांचा अर्थ सांगा.

---

### धडा अकरावा

# घरांतील नोकरचाकर



सकाळची वेळ होती. भिकू खोल्यांतला केर काढीत होता. इतक्यांत मुलें धडपड करीत खालीं आलीं. एकानें भिकूची टोपी पळविली, दुसरा त्याच्या पाठीवर

बसला, तिसरा 'भिक्या, भीकमाग्या' करून त्याला हिणवूं लागला. तें ऐकतांच आईनें आंतून येऊन एक धपका बंडूच्या पाठींत घातला व ती ओरडली,

'तुझ्या घरीं आला का भीक मागायला तो? वात्रट कुठला! देवानें तोंड दिलं आहे तें असं वेडंवाकडं बोलायला होय? भिकू गडी झाला म्हणून त्याला तुम्ही वाटेल तसं बोलणार कीं काय? खबरदार त्याची चेष्टा कराल किंवा त्याला त्रास द्याल तर!'

आई रागें भरतांच मुलें तेथून भराभर सटकलीं व तोंड धुण्यासाठीं मोरींत गेलीं. आई कामाला लागली. दुपारीं मुलें जेवायला बसलीं असतांना तिला पुन्हा बोलण्याची वेळ आली. स्वयंपाकीणबाई वाढीत असतां 'मला भाजी कशाला वाढली?', 'मला आमटी कां नाहीं घातली?', 'मला मागाहून कां?', 'त्याला आधीं कां?' असें लागलीं करायला! आई होतीच जवळ!

'कां सकाळचं विसरलांत वाटतं? लागलांत पुन्हा विनाकारण त्रास द्यायला! बाईंना दोन हात आहेत का दहा? आधीं कसलं आणि मागून कसलं? नसत्या

कुरापती काढायच्या ! हवं नाहीं आणि नको नाहीं. सगळं एकेकदा खाऊन बघायचं ! आजीबाईंना उगीच नाहीं त्रास द्यायचा ! त्या केवढ्या आणि तुम्ही केवढीं? त्यांना नाहीं हो वाटेल तसं बोलायचं.'

संध्याकाळीं मुलांचा गडी उशिरां आला. आई अर्थात् त्यालाही बोलली, 'बाळू, तूं अलीकडे दोन्ही वेळां उशीर करतोस हं. अशानं मुलांची आबाळ होते. उशिरा यायचं आणि मग कसं तरी एकदा काम उरकायचं. मुलांचे दांत नीट घासून होत नाहींत, आंघोळीच्या वेळीं त्यांचं नीट अंग चोळून होत नाहीं, त्यांचे कपडे व्यवस्थेनं राहात नाहींत, त्यांचं फिरणं-सवरणं नीट होत नाहीं. असं नाहीं चलायचं. काम करायचं तर वेळेवर यावं आणि नीटपणें काम करावं.'

बाळूनें आईचें बोलणें ऐकलें, न ऐकल्यासारखें केलें. मुलांना घेऊन तो बागेंत गेला. तेथें इतर मुलें खेळत होतींच. त्या मुलांत या मुलांना त्यानें सोडून दिलें व स्वतः इतर गड्यांबरोबर तो गप्पा मारूं लागला. इतक्यांत तेथें एक नवीन गडी आला. कशावरून

तरी बाळूची व त्याची बाचाबाची झाली. दोघेही एकमेकांना शिव्या देऊं लागले. गड्यांचें भांडण पाहून लहान मुलें घाबरलीं व रडूं लागलीं. त्याच वेळीं मुलांचे वडील ऑफिसांतून घरीं परत येत होते. त्यांनीं तो सर्व प्रकार पाहिला. ते बागेंत शिरले. मुलांना त्यांनीं समजाविलें व सगळ्यांना घेऊन ते घरीं आले. आईला त्यांनीं सगळी हकीकत सांगितली. 'असले नोकर असण्यापेक्षां नोकर नसलेले काय वाईट ?' ते म्हणाले. तेवढ्यांत बाळू मुकाट्यानें घरांत शिरला.

'आलास का मुलांना घेऊन ?' वडिलांनीं विचारलें. बाळू गोरामोरा झाला.

'चांगलं संभाळतोस मुलांना,' आई म्हणाली– वडिलांनीं त्याला उभें केलें व ते बोलूं लागले,

'बाळू, तूं उद्यांपासून कामावर येऊं नको. तुझ्यावर मुलं टाकणं सुरक्षित नाहीं. घरचा गडी कसा इमानी व प्रेमळ पाहिजे, त्याचं वागणं व बोलण नीट पाहिजे. नाहीं तर सुधारायच्या ऐवजीं मुलं बिघडायचीं. तीं शिव्या द्यायला शिकायचीं. लहान मुलांना संभाळणं

हें मोठं अवघड काम आहे. तें तुला कधींही करतां येणार नाहीं.'

**अभ्यास :** (१) मुलांनीं मिकूला काय त्रास दिला? (२) आई त्यांना काय बोलली? (३) स्वयंपाकीणबाईंना मुलें काय बोललीं? (४) बाळूला आई कशावरून रागावली? (५) बागेंत बाळूनें काय केलें? (६) वडिलांनीं बाळूला कामावरून कां काढलें?

धडा बारावा

# मुलें आणि घरांतील मंडळी



सकाळची वेळ होती. शामू दूध न पितां तसाच कोपऱ्यांत जाऊन बसला होता. 'का रे, पोटाला हात लावून बसला आहेस!' वडिलांनीं विचारलें.

'आतां कां गप्प?' आई म्हणाली, 'रोज साखर खाऊन पोटांत जंत झाले आहेत. नको म्हटलं तर ऐकायचं नाहीं. आतां बस पोट दुखतं म्हणून रडत.' 'पाहिलंस शामू,' वडील म्हणाले, 'आईचं ऐकलं नाहीं म्हणजे काय होतं तें? आतां तुला त्रास आणि आईला त्रास! रोज गोड खाऊं नये. यापुढं ऐकशील ना आईचं?'

*                *                *

वडील वर होते. आई स्वयंपाकघरांत काम करीत होती. तेथून तिनें मोठ्या व धाकट्या मुलीचें बोलणें ऐकलें. 'माले, सुया व लोकर घेऊन ये. तुला गळपट्टा शिकवतें,' मोठी म्हणाली.

'मी नाहीं येत जा,' धाकटीनें उत्तर दिलें.

'आईला सांगूं का?'

'खुशाल सांगा बरं ताईसाहेब. आई काय माझं करणार आहे?'

'सांगतें हं काय करणार आहे ती.' आई आंतून ओरडत आली. 'कुणाची जीभ वळवळते आहे बघूं.'

'अग नाहीं आई, मीं थट्टा केली,' धाकटी मार चुकविण्यासाठीं म्हणाली.

'थट्टा ? कुणाची ? मोठ्या बहिणीची ? उद्यां माझी करशील ! चल, पड ताईच्या पायां आणि म्हण, चुकलें म्हणून. अस्सं. आतां जा लोकर घेऊन ये आणि बस शिकायला तिच्याजवळ ! वात्रट कुठली. पुन्हा मोठ्या माणसाला वेडंवाकडं बोलशील तर बघ !'

दोन प्रहरीं मुलें अंगणांत खेळत होतीं. लहान, मोठीं, सख्खीं, चुलत, सगळीं होतीं. प्रथम लहान मुलांना मोठ्यांनीं खेळांतून वगळलें म्हणून तीं आईकडे रडत गेलीं. नंतर कांहीं वेळानें काकीच्या व या मुलांचें भांडण होऊन काकीचीं मुलें काकीकडे तक्रार करीत गेलीं. आईनें त्या मुलांचीं अगोदर समजूत घातली व मग ती या मुलांना म्हणाली—

'हें पाहा, तुम्ही सगळीं बहीणभावंडं ना ? एकाच घरांतलीं तुम्ही सारीं ना ? मग असं भांडायचं नाहीं एकमेकांशीं ! जीं मुलं भांडतात, त्यांना कधीं चांगलं खेळतां येत नाहीं. तुम्हांला खेळायला शिकायचं, कीं भांडायला ? शाळेंत जाणाऱ्या मुलांनीं असं भांडायचं

नाहीं ! नाहींतर लोक तुम्हांला वेडीं म्हणतील. आपल्या भांवडांशीं तुमचं पटलं नाहीं, तर शाळेंतल्या मुलांशीं कसं पटेल ?

'तसंच, लहान मुलांना तुम्हीं असं दूर नाहीं सारायचं ! तीं तुमचीं भावंडं ना ? मग तीं कुठें जातील ? त्यांना कांहींतरी खेळ शिकवा. नाहीं तर त्यांना वाईट वाटतं. त्यांना वगळूं नये !'

संध्याकाळीं मुलें फिरायला गेलीं होतीं. काळोख झाला तरी तीं घरीं परतलीं नाहींत. मुलांचे काका नुकतेच घरीं येऊन खुर्चीवर पडले होते. तेवढ्यांत आरडत ओरडत मुलें घरीं आलीं. 'अरे, केवढ्यानं ओरडतां ? रस्त्यावरलीं माणसं तुम्हांला हसत असतील. चांगल्या घरचीं मुलं तुम्ही ! तुम्हांला आम्हांला लोक नांवं ठेवतील.' काका म्हणाले.

'हो, नांवं ठेवतील ! आम्ही मुलंच आहोंत,' मोठा मुलगा बोलूं लागला, 'आम्हीं हसावं, खेळावं, नाहीं तर काय म्हाताऱ्या माणसासारख्या कपाळाला आठ्या घालाव्या होय ? काका, तुम्हांला आपलं आरामखुर्चीवर पडून राहायला हवं....'

तितक्यांत जिन्यावर मुलांच्या वडिलांचीं पावलें वाजलीं. मोठा मनांत चरकला. 'कां थांबलास कां? थांबली का तुझी तोंडपाटिलकी! मूर्खा, काकांना शिकवतोस होय! देऊं का एक थोबाडींत? सारं ऐकलं मीं. चूक कबूल करायची सोडून वर आचरटपणानं बोलतोस होय! तुम्ही चांगल्या घरचीं मुलं, कीं गांवांतलीं चहाटळ पोरं? वडील माणसांचा अपमान करायला कुणीं शिकवलं तुला? पड पायां अगोदर काकांच्या आणि माग त्यांची क्षमा!

मोठा मुकाट्यानें काकांच्या पायां पडला. काकांनीं त्याला जवळ ओढलें व लहान मुलांनीं कसें वागावें याबद्दल त्याला दोन गोष्टी सांगितल्या.

रात्रीं जेवण झाल्यावर मुलें व मोठीं माणसें सगळीं गच्चीवर हवा खात बसलीं होतीं. बोलतां बोलतां मालू सांगूं लागली, 'बाबा, आज मैदानावर एक मुलगा आपला चेंडू विसरून गेला. वसंतानं तो हळूच खिशांत घातला. मीं चौकशी केली व तो ज्याचा होता त्याला नेऊन दिला.'

वडील : शाबास, चांगलं केलंस ! कोणाची वस्तु सापडली तर ती ज्याची त्याला परत करावी. वशा, गाढवा, दुसऱ्याचा चेंडू खिशांत घालतोस ? खोटं बोलतोस ? चोरी करायला शिकतोस ?

वसंत : नाहीं बाबा, मी ज्याचा त्याला देणार होतों.

वडील : चूप, बोलूं नको. पुन्हा दुसऱ्याच्या वस्तूला हात लावशील तर याद राख ! आईबापांना खालीं मान घालण्याचा प्रसंग यायचा तुम्हां मुलांच्या अशा वागण्यानं.

आई : आज सहामाही परिक्षेचे मार्क कळले आहेत. मधूचा पहिला नंबर आला आहे. बाकीच्यांचे मार्क साधारण आहेत.

वडील : मधू आहेच तसा शहाणा ! त्याचं बोलणं, चालणं, वागणं सगळं व्यवस्थित ! त्याला कधीं आईला अथवा मला बोलायला लागत नाहीं. शाबास मधू, असाच नेहमीं पहिला नंबर मिळवीत जा ! मुलांनो, तुम्ही मधूसारखं वागा, म्हणजे तुम्हांलाही शाबासकी मिळेल. मुलांनीं वागण्याचे पांच नियम ध्यानांत ठेवावे. १. नेहमीं खरें बोलावें. २. वडील

माणसांचें ऐकावें. ३. परस्परांशीं प्रेमानें वागावें. ४. दुसऱ्याच्या वस्तूला हात लावूं नये. ५. खेळावयाच्या वेळीं खेळावें, अभ्यासाच्या वेळीं अभ्यास करावा.

'मुलांशिवाय घराला शोभा नाहीं असं म्हणतात. चांगलीं मुलं हीं खरोखरच घराची शोभा होत. तुम्ही सगळीं चांगलीं मुलं होण्याचा प्रयत्न करा!'

---

**अभ्यास :** (१) शामू कोपऱ्यांत कां बसला होता? (२) मालूनें मोठ्या बहिणीला काय उत्तर दिलें? (३) भांडणाऱ्या मुलांना आईनें काय सांगितलें? (४) मोठा मुलगा काकांना काय बोलला? (५) त्याबद्दल वडिलांनीं मोठ्या मुलाला काय केलें? (६) मालूनें चेंडू-बद्दल काय सांगितलें? (७) मधूला शाबासकी कां मिळाली? (८) वसंताला चेंडू पळवायचा होता काय? (९) वडिलांनीं मुलांना कोणत्या पांच गोष्टी ध्यानांत ठेवण्यास सांगितल्या? (१०) 'चांगलीं मुलें हीं घराची शोभा होत' या वाक्याचा अर्थ सांगा.

---

धडा तेरावा

# मुलांना करतां येण्यासारखीं कामें

नुकतेच उजाडलें होतें. अंगांत गरम कपडे घालून मुलें बागेंत फुलें तोडीत होतीं. गुलाब, मोगरा, जाई, जुई, देशी-विलायती सुंदर सुंदर फुलें त्यांनीं काढलीं.

मुली देवासाठीं वासाच्या फुलांच्या माळा करूं लागल्या. मुलगे फुलदाण्या भरूं लागले. मुलांचे वडील खालीं



आले. मुलांचें काम व कौशल्य पाहून त्यांना फार आनंद वाटला. 'किती गोड काम करतां आहांत तुम्ही ?' वडील म्हणाले, 'मुलांना फुलं आणि फुलांना मुलं फार आवडतात ! फुलं तोडण्याचं काम मुलं किती चांगलं करूं शकतात ! मुलांनो, हें काम तुम्ही रोज हौसेनें करीत जा.'

आंघोळी झाल्यावर मुलांनीं कपडे घातले. इतक्यांत आईनें सगळ्यांना हाक मारली. 'आज उकडलेल्या

दि. ...५१ आ. वा

बटाट्यांची भाजी करायची आहे’ आई म्हणाली, ‘बटाटे सोलायला कोण कोण येत आहे?’ बाळूशिवाय सगळीं ‘मी, मी’ करीत पुढें झालीं. आईनें दरडी पुढें ठेवली. मुलें भराभर बटाटे सोलूं लागलीं. आईनें मुलांच्या वडिलांना हाक मारली. ‘पाहिलं का मुलांचं गृहशिक्षण!’ आई म्हणाली.

‘वा छान! पण यांत बाळू कुठं दिसत नाहीं?’ वडिलांनीं विचारलें.

‘तो लाडोबा जेवायला आधीं, निजायला मधीं, कामाला कधींबिधीं.’

‘असं नाहीं. असं आळशी होऊन नाहीं उपयोगी. तुम्ही त्याला आज बटाट्याची भाजी वाढूं नका, म्हणजे पुन्हा नाहीं तो असा कामचुकारपणा करणार.’

‘मी आलों, मी आलों बटाटे सोलायला,’ बाळू ओरडत आला. ‘मला हवी भाजी, पुष्कळ हवी.’

‘कशी मात्रा लागू पडली.’ बाबा हसत म्हणाले, ‘काम करायला येत नाहीं काय?’

'पण आतां बटाटे झाले सोलून,' आई म्हणाली, 'तुला कांहीं उरलेच नाहींत सोलायला.'

'मग मला दुसरं कांहीं तरी काम सांग. पण मला भाजी हवी. पुन्हा नाहीं मी असं करायचा.'

'बरं!' आई म्हणाली, 'तर मग, वर बेबी निजली आहे. तिला थोडा ताप भरला आहे. तिच्याजवळ बैस घटकाभर. तिला कपांतून औषधाचा भाग व मोसंब्याच्या फोडी दे. तिचं अंग चेप. तिला गोष्टी सांग. म्हणजे तिला तेवढं बरं वाटेल.' बाळूनें मान डोलावली व तो तसाच वर बेबी होती त्या खोलींत गेला.

ऑफिसला जातांना बाबा म्हणाले, 'हें पाहा, आज तुमची शाळा महिनाअखेर असल्यामुळें लवकर सुटणार आहे. तेव्हां घरीं आल्यावर खोलींतील पुस्तकें झटकून नीट लावून ठेवा. बाळूला सोडूं नका हं.'

घरीं आल्याबरोबर मुलें तडक वर गेलीं. आईनें खायला हाक मारली, तरीसुद्धा 'आधीं आम्ही काम करतों, मग खातों' असें त्यांनीं सांगितलें. पुस्तकें

लावण्याच्या कामाला सुरुवात झाली. एकानें पुस्तकें काढलीं. दुसऱ्यानें तीं झटकलीं. तिसऱ्यानें तीं लहान-मोठ्या आकाराप्रमाणें लावलीं. चौथ्यानें तिथला कचरा गोळा केला. थोड्या वेळांत टेबल कसें सुंदर दिसूं लागलें. आईनें वर येऊन सगळ्यांना शाबासकी दिली. वडील आल्यावर त्यांनाही फार संतोष झाला व ते मुलांना म्हणाले, 'असंच घरांतलं थोडं थोडं काम करायला शिकावं. त्यानं घरांत मदत होते व शिवाय काम करण्याची सवयही लागते. नुसतीं पुस्तकं वाचून काय उपयोग ? काम करतां आलं पाहिजे !'

इतकें बोलून त्यांनीं आणलेलें पुडकें सोडलें व त्यांतलें एक एक नवें, गोष्टींचें व चित्रांचें पुस्तक एकेकाला दिलें. 'हें घ्या आजच्या कामाचं बक्षिस.' ते म्हणाले, 'असंच काम करीत जा आणि अशींच बक्षिसं मिळवीत जा.'

'या बाळकोबाला—का बैलोबाला द्यायचं का बक्षीस ?' त्यांनीं विचारलें.

'हो, हो.' मुलें म्हणालीं, 'बाबा, आज बाळोबांनीं केवढं तरी काम केलं.'

नव्या पुस्तकांतलीं चित्र बघण्यांत व गोष्टी वाचण्यांत मुलें किती तरी वेळ गर्क होतीं. शेवटीं आईनेंच त्यांना खायला प्यायला खालीं बोलाविलें. फराळ केल्यावर आई म्हणाली,

'तुम्ही सगळीं आज शहाणीं मुलं झालांत ना? मग आतां माझं एक काम करा! बघूं कसं करतां तें!'

'सांग, सांग. एकच कां? हवीं तेवढीं कामं सांग. आम्ही करीं बिनचूक करून दाखवितों.'

'होय? मग दोन रुपये देतें. वाण्याकडून थोडा रवा व कोपऱ्यावरून थोडी भाजी घेऊन या! किडकी बिडकी आणूं नका, हिशेब चुकूं नका.'

पिशव्या घेऊन मुलें निघालीं. वाण्याच्या दुकानांत त्यांनीं अर्धा किलो रवा घेतला. कांट्याकडे व वजनाकडे सगळीं अगदीं टक लावून बघत होतीं. रुपया देऊन बाकीचे पैसे त्यांनीं परत घेतले व तेथून तीं भाजी आणण्यास गेलीं.

भाजीवालीजवळून त्यांनीं अर्धा किलो वांगीं, थोड्या शेंगा व मिरच्या-कोथिंबीर घेतली. तिच्याजवळ सगळ्यांनीं ताजी-शिळी, जून-कोवळी अशी बरीच कटकट केली. शेवटीं तिला पैसे देऊन मुलें घरीं आलीं.

'आलांत का बाजार करून ?' आईनें विचारलें व पिशव्यांतला माल बाहेर काढून बघितला. 'जूनबीन नाहीं हो भाजी. वजनांतही तुम्हांला फसवलेलं दिसत नाहीं.' आई म्हणाली, 'बरं, पैसे किती परत आणलेत ?'

'५० पैसे' मुलें म्हणालीं. परंतु सगळा हिशेब करतांना दोन पैसे कमी आले असें आढळून आलें.

'ओ हो हो, फजिती. हिशेब चुकला.' आई थट्टेनें म्हणाली. परंतु लागलीच त्यांना वाईट वाटूं नये म्हणून तिनें त्यांना जवळ घेऊन सगळ्यांच्या अंगावरून हात फिरवला.

वडिलांनाही तो सर्व प्रकार पाहून मुलांचें कौतुक वाटलें व ते म्हणाले,

'हरकत नाहीं. दोन पैसेच कमी आले ना ? हरकत नाहीं. चुका करून करूनच आपण शहाणे

होतों. चुका चालतील, पण कामचुकारपणा नाहीं उपयोगी. तुम्हांला कामाची हौस आहे, आळस नाहीं हें फार चांगलं. काम करणं हें प्रत्येकाचं कर्तव्य आहे. उद्योग हा मनुष्याचा मित्र, आळस हा शत्रु. लहानपणीं लहान लहान कामं करतां करतांच मोठेपणीं तुमच्या हातून मोठमोठीं कामं होतील. उद्योगाचे घरीं ऋद्धिसिद्धि पाणी भरी, असं म्हटलंच आहे.'

---

**अभ्यास** : (१) मुलें सकाळीं उठून बागेंत काय करीत होतीं? (२) वडिलांनीं बाळूला काम करायला आणण्यासाठीं काय युक्ति केली? (३) मुलें आजाऱ्याचें काय काम करूं शकतात? (४) मुलांना नवीं पुस्तकें कशाबद्दल बक्षीस मिळालीं? (५) मुलांनीं बाजार कसा काय केला? (६) काम करणें वाईट कीं चांगलें? (७) लहान मुलें घरीं काय काय कामें करूं शकतील?

IRBK-0116635
IRBK-0116635
म. श्री. सं. [illegible], वाचनालय शाखा.